डाक नोंदणी पोच देय

MAHA DES

दूरध्वनी क्र. २६३८३००९/२६३८३०१६
Email ID: ddadm.des@hotmail.com
dydiradm.des@maharashtra.gov.in

महाराष्ट्र शासन
नियोजन विभाग,
अर्थ व सांख्यिकी संचालनालय
प्रशासकीय इमारत, मुंबई उपनगर जिल्हा, ८ वा मजला, शासकीय वसाहत,
वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१.

क्रमांक: अनुकंपा/२०२१/लिटं-शिपाई/१३८/प्रशा-२/५५० दिनांक: - 22/8/2021

वाचा :- १. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक:अकंपा-१००४/ प्र.क्र.५१/२००४/ आठ, दिनांक २२/०८/२००५.
२. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक अकंपा १२१७/प्र.क्र.१०२/आठ, दिनांक २१/०९/२०१७

कार्यालयीन आदेश

संचालनालयातील गट-ड च्या अनुकंपा प्रतिक्षासूचीवरील खालील उमेदवार अनुकंपा तत्वावर नियुक्तीसाठी सामान्य प्रशासन विभागाच्या दि.२२/०८/२००५ च्या शासन निर्णयातील आवश्यक असलेल्या अर्हता पूर्ण करत असल्यामुळे तसेच गट-ड पदावरील नियुक्तीसाठीची शैक्षणिक अर्हता धारण करत असल्यामुळे खालील तक्त्यात त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या सामाजिक प्रवर्गाअंर्तगत व कार्यालयात गट- ड मधील शिपाई या रिक्त पदावर रूपये S१: १५०००-४७६०० या वेतनश्रेणीत ते रुजू होतील त्या दिनांकापासून पुढील आदेश मिळेपर्यंत या आदेशातील सेवाशर्तीच्या अधीन राहून निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात अनुकंपा तत्वावर नियुक्तीने पदस्थापना देण्यात येत आहे. त्यांना शासन नियमानुसार मूळ वेतनाव्यतिरिक्त इतर भत्ते ही अनुज्ञेय राहतील.

| अ. क्र. | उमेदवाराचे नाव | नियुक्तीचा प्रवर्ग | ज्या कार्यालयात पदस्थापना करण्यात आली ते कार्यालय |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १. | श्रीम. संगीता दशरथ बोलकर, मु.पो.नागापूर, ता.कन्नड, जि.औरंगाबाद-४३११४७ | इमाव | जिल्हा सांख्यिकी कार्यालय, मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, २ रा मजला, औरंगाबाद-४३१००१ |
| २. | श्री. प्रणय सुभाषचंद्र बन्सोड, द्वारा सौ. वसंतिका गोपीचंद शेन्डे, इंदिरा गांधी वार्ड, ई.एल.चर्च जवळ, ता.जि. भंडारा-४४१९०४ | अजा | जिल्हा सांख्यिकी कार्यालय, श्री. सार्वे निवास, विदर्भ हाउसिंग कॉलनी, साई मंदीर रोड, तळिया वार्ड, अलाहाबाद बँक जवळ, भंडारा-४४१९०४ |
| ३. | श्री. विशाल विठ्ठल गिते, फ्लॅट नं.१६, वास्तुशिल्प अपार्टमेंट, भारती विद्यापीठ मागे, आंबेगाव बु. कात्रज, पुणे ४११०४६ | इमाव | जिल्हा सांख्यिकी कार्यालय, २५ शुक्रवार पेठ, महात्मा फुले मंडई समोर, श्री. स्वामी समर्थ मठा जवळ, P.M.C. कर्मशियल इमारत, २ रा मजला, पुणे-४११००२ |
| ४. | श्री. संदेश तानाजी चव्हाण, ३१९, साई ईच्छा बिल्डिंग कॅम्प, रोहिंजग, तळोजा, नवी मुंबई ४१०२०८. | विजा-अ | अर्थ व सांख्यिकी संचालनालय, प्रादेशिक कार्यालय, कोकण विभाग, कोकण भवन, ७ वा मजला, बेलापूर, नवी मुंबई-४००६१४ |

## <u>सेवाशर्ती</u>

१. नियुक्ती स्विकारण्यासाठी उपस्थित राहताना वय/ जन्मदिनांक, अधिवास, शैक्षणिक पात्रता, जात प्रमाणपत्र/ जात वैधता प्रमाणपत्र, उन्नत व प्रगत गटात (क्रिमीलेयर) मोडत नसल्याचे प्रमाणपत्र इत्यादीबाबतची मूळ प्रमाणपत्रे उमेदवारांनी बरोबर घेऊन यावीत. **नियुक्ती स्विकारण्यासाठी उपस्थित राहताना सदर प्रमाणपत्रांच्या साक्षांकित प्रती उमेदवाराजवळ असणे अत्यावश्यक आहे.**

२. महाराष्ट्र शासनाच्या विभागातील व त्यांच्या अधिपत्याखालील कार्यालयातील गट-"ड" पदांचे (सेवाप्रवेश) नियम २०१७ मधील तरतुदींनुसार गट-ड मध्ये नियुक्तीसाठी माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

३. मागासवर्गीयांसाठी राखीव असलेल्या पदावरील नियुक्तीसाठी शिफारस करण्यात आलेल्या उमेदवारांची जात वैधता प्रमाणपत्राची वैधता तपासण्याच्या अधिन राहून तात्पुरत्या स्वरूपात नियुक्ती करण्यात येत आहे. उमेदवाराकडे जात पडताळणी समितीकडून प्राप्त करून घेतलेले जात वैधता प्रमाणपत्र असल्यास त्याने नियुक्तीसाठी हजर होताना ते सादर करावे, नसल्यास उमेदवाराने नियुक्ती स्विकारताच जात वैधता तपासणी करण्यासाठी आवश्यक असलेली सर्व कागदपत्रे/ प्रमाणपत्र नियुक्ती प्राधिकाऱ्यास तात्काळ सादर करावी. शिपाई **पदावर रूजू झाल्याच्या दिनांकापासून सहा महिन्याच्या आत जात वैधता पडताळणी समितीकडून जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त करून घेण्याची जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील.** या कालावधीत जात वैधता प्रमाणपत्र सादर करू न शकल्यास सदर उमेदवाराची सेवा कोणतीही पूर्व सूचना न देता समाप्त करण्यात येईल. तथापि, ज्या मागासवर्गीय उमेदवारांची खुल्या प्रवर्गातील पदावर शिफारस करण्यात आलेली असेल त्या उमेदवारांबाबत सामाजिक न्याय, सांस्कृतीक कार्य व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्रमांक सीबीसी-१०/२००४/प्र.क्र.५७०/मावक-५, दिनांक १६/०५/२००७ नुसार कार्यवाही करण्यात येईल.

४. अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती प्रवर्गा व्यतिरिक्त उर्वरीत मागास प्रवर्गातील उमेदवारांचे उन्नत व प्रगत गटात (क्रिमीलेयर) मोडत नसल्याचे प्रमाणपत्र सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य व विशेष सहाय्य विभागाच्या शासन निर्णय क्रमांक ईबीसी-२०१८/प्र.क्र.६८/एसडी-५, दिनांक ०९/०१/२०१९ अन्वये विहीत केलेल्या तरतुदीनुसार तसेच शासन परिपत्रक क्रमांक सीबीसी-१०/२००६/प्र.क्र.१५/मावक-५, दिनांक ३०/०६/२००६ अन्वये दिलेल्या सुचनेनुसार असावे.

५. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक अकंपा-१०१३/प्र.क्र.८/आठ, दिनांक २६/०२/२०१३ मधील तरतुदीनुसार नियुक्त उमेदवारांनी अनुकंपा तत्वावर शिपाई पदावर रूजू होताना दिवंगत शासकीय कर्मचा-यांच्या कुटूंबियांचा सांभाळ करण्यासंदर्भात प्रतिज्ञापत्र (स्टँप पेपरवर) सादर करावे. अनुकंपा तत्वावर शिपाई पदावर नियुक्ती मिळाल्यानंतर उमेदवार कुटुंबीयांचा सांभाळ करीत नसल्याचे आढळल्यास त्यांची सेवा तात्काळ समाप्त करण्यात येईल.

६. नियुक्त उमेदवारांनी दिवंगत शासकीय कर्मचा-यांचा कायदेशीर वारस असल्याचे प्राधिकृत अधिकाऱ्यांनी प्रमाणित केलेले प्रमाणपत्र (उमेदवाराच्या छायाचित्रासह) सादर करावे.

७. नियुक्त उमेदवारांना नियुक्ती स्विकारण्या अगोदर यापूर्वी शासनाकडून/ क्षेत्रिय कार्यालयाकडून अनुकंपा तत्वावर नोकरी देण्यात आली नसल्याबाबतचे तसेच संबंधितांच्या कुटुंबातील कोणतीही व्यक्ती शासन सेवेत कार्यरत नसल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र लिहून द्यावे लागेल.

८. उमेदवारांची नियुक्ती अनुकंपा तत्वावर करण्यात येत असल्याने त्यांची नियुक्ती पुढील आदेश होईपर्यंत करण्यात आली असून त्यांची सेवा समाप्ती कोणतीही पुर्वसूचना न देता करण्यात येईल. तसेच सदर नियुक्ती निव्वळ तात्पुरत्या स्वरुपाची असून उमेदवार शासन धोरणानुसार अनुकंपा तत्वावरील नियुक्तीसाठी अपात्र असल्याचे कोणत्याही टप्प्यावर आढळून आल्यास त्यांची नियुक्ती कोणतीही पूर्वसूचना न देता संपुष्टात आणण्याचे अधिकार नियुक्ती प्राधिकारी यांना राहतील.

९. उमेदवारांना शासन सेवेतील नियुक्तीसंदर्भात आवश्यक साक्षांकन नमुना भरुन द्यावा लागेल. सदरची नियुक्ती त्यांच्या पूर्वचारित्र्याची पडताळणी करण्यापूर्वी करण्यात येणार असल्यामुळे त्यांची नियुक्ती ही निव्वळ तात्पुरत्या स्वरुपाची असून त्यांच्या चारित्र्य व पूर्व चारित्र्य पडताळणीचा अहवाल असमानधारक असल्याचे निदर्शनास आल्यास त्यांची नियुक्ती कोणतेही कारण न देता एक महिन्याची नोटीस देऊन समाप्त करण्यात येईल.

१०. जर त्यांना नोकरी सोडावयाची असेल तर त्यांनी एक महिन्यापेक्षा कमी नाही इतक्या दिवसांची आगाऊ लेखी सूचना द्यावी. अन्यथा त्यांना त्यांच्या एक महिन्याच्या मूळ वेतनाएवढी रक्कम शासन जमा करावी लागेल.

११. सदरची नेमणूक वैद्यकीय तपासणीमध्ये शारिरीकदृष्टया पात्र असण्याच्या अटीवर अवलंबून राहील.

१२. सदरची नियुक्ती दिनांक १/११/२००५ नंतरची असल्याने वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक अनियो-१००५/१२६/सेवा-४, दिनांक ३१/१०/२००५ नुसार त्यांना अंशदान निवृत्तीवेतन योजना (Defined Contribution Pension Scheme) लागू ठरेल. मात्र सध्या अस्तित्वात असलेली निवृत्ती वेतन योजना [म्हणजे महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ व महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतनाचे अंशराशीकरण) नियम १९८४] आणि सध्या अस्तित्वात असलेली सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना त्यांना लागू होणार नाही.

१३. नियुक्ती स्विकारताना महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापन) नियम २००५ मधील तरतुदीनुसार विहित नमुना-अ मधील प्रतिज्ञापन सादर करावे लागेल.

१४. वरील गोष्टींना मान्यता दिल्यानंतर त्यांना नोकरनाम्यावर तसेच निष्ठा शपथेवर स्वाक्षरी करावी लागेल.

१५. संचालनालयाची पदे राज्यस्तरीय असल्याने उमेदवार राज्यात संचालनालयाच्या अधिनस्त कोणत्याही कार्यालयात बदलीस पात्र राहतील.

१६. सदर उमेदवाराने नियुक्तीच्या दिनांकापासून सहा महिन्याच्या आत स्वग्राम घोषीत करणे आवश्यक आहे. तद्नंतर त्यांनी स्वग्राम घोषीत केल्यास त्यात फेरबदल करता येणार नाही.

१७. वरील उमेदवारांनी पदस्थापनेच्या पदावर या आदेशाच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत रूजू व्हावे. या कालावधीत ते रूजू न झाल्यास त्यांचे शिपाई पदावरील नियुक्तीचे आदेश रद्द समजण्यात येतील व त्यांच्या अनुकंपा तत्वावरील नोकरी मिळविण्याचा हक्क आपोआप संपुष्टात येईल.

१८. संबंधित कार्यालय प्रमुखांनी उमेदवार रूजू झाल्यानंतर त्याबाबतचा अहवाल संचालनालयास सादर करावा.

(र.र.शिंगे)
संचालक,
अर्थ व सांख्यिकी संचालनालय,
मुंबई.

प्रति,

-------------------------------------

-----------------------------------------------

-----------------------------------------------

प्रत : माहिती तथा योग्य त्या कार्यवाहीसाठी

१. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१/ २, मुंबई/ नागपूर.
२. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, जालना/ पुणे/ गडचिरोली/ ठाणे.
३. कार्यासन अधिकारी, नियोजन विभाग (का.१४२६), मंत्रालय, मुंबई.
४. कार्यासन अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग (का.१४-अ), मंत्रालय, मुंबई.
५. सहसंचालक,अर्थ व सांख्यिकी संचालनालय,प्रादेशिक कार्यालय, नवी मुंबई/ पुणे/ औरंगाबाद/ नागपूर.
६. अपर कोषागार अधिकारी, अपर कोषागार कार्यालय, कोकण भवन, नवी मुंबई.
७. जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे/ औरंगाबाद/ भंडारा.
८. जिल्हा सांख्यिकी कार्यालय, पुणे/ औरंगाबाद/ भंडारा.

प्रत :

| | | |
|---|---|---|
| १. अपर संचालक (सर्व) | [] | |
| २. सह संचालक (सर्व) | [] | |
| ३. प्रशासन शाखा-१/२/३/४ | [] | अर्थ व सांख्यिकी संचालनालय, |
| ४. ज्येष्ठतासूची शाखा (प्रशा-२) | [] | मुख्य कार्यालय, मुंबई. |
| ५. प्रशिक्षण शाखा | [] | |
| ६. सेवापुस्तक कार्यासन (प्रशा-४) | [] | |
| ७. मुख्य संगणक नोंदवही (प्रशा-२) | [] | |
| ८. निवड नस्ती | [] | |